महाराष्ट्र शासन

नोंदणी व मुद्रांक विभाग

**नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक, महाराष्ट्र राज्य, पुणे**

तळमजला, नवीन प्रशासकीय इमारत, विधान भवन समोर, पुणे -411001

नोंदणी व मुद्रांक विभाग

दूरध्वनी क्र.020-26124012 Email-do4.igro@igrmaharashtra.gov.in

---

क्रमांक-का.4/2025/920 दिनांक- 13/5/2025

प्रति,

1. सर्व नोंदणी उपमहानिरीक्षक
2. सर्व सह जिल्हा निबंधक

विषयः देवस्थान वतन जमिनींच्या हस्तांतरणाचे दस्तऐवजांच्या नोंदणीबाबत.

मा. मंत्री, महसूल, महाराष्ट्र राज्य यांच्या अध्यक्षतेखाली व मा. पालकमंत्री, कोल्हापूर यांचे उपस्थितीत दि.13/5/2025 रोजी झालेल्या ऑनलाईन बैठकीत देवस्थान मिळकतीबाबत दिलेल्या निर्देशानुसार आपणास सूचित करण्यात येते की, देवस्थान इनाम मिळकतीचे अनुषंगाने शासन स्तरावर धोरण ठरविण्याची कार्यवाही सुरु आहे; त्यामुळे सक्षम प्राधिका-याचे विक्री परवानगी आदेश असतील ते खेरीज करुन किंवा मा. न्यायालयाचे विक्रीस मंजूरी आदेश असतील ते खेरीज करुन राज्यातील कोणत्याही देवस्थान मिळकतीचे खरेदी-विक्री व्यवहारांचे दस्त नोंदणीस स्वीकारु नयेत. असे दस्त स्वीकारल्यास त्याबाबतची सर्व जबाबदारी संबंधित दुय्यम निबंधक यांची राहील. सदरची बाब आपले अधिनस्त सर्व दुय्यम निबंधक यांना तात्काळ अवगत करावी.

का.प्र. मा.नों.म.नि.यांचे मान्यतेने.

नोंदणी उपमहानिरीक्षक (मुख्यालय)
महाराष्ट्र राज्य, पुणे.

प्रत सविनय सादर -

1. मा. खाजगी सचिव, मा.मंत्री, महसूल, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई.
2. मा.सह सचिव, महसूल व वनविभाग,(म१), मंत्रालय, मुंबई.